# जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर.

## :: जाहीर नोटीस ::

जिल्हा व सत्र न्यायालय लातूर मुख्यालयी अभिलेख विभागातील जुनी रद्दी (नाश करण्यात आलेल्या अभिलेखाची) विक्री करण्यासाठी स्थानिक रद्दी विकत घेणा–या व्यापा–यांकडून अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

## अटी व शर्ती :–

१. सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **दिनांक ०५/०९/२०२६** पर्यंत जिल्हा न्यायालय, लातूर येथे **''मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, लातूर''** यांचे नावाने बंद लखोटयात दरपत्रक सादर करावे. लखोटयावर **''रद्दी खरेदीबाबत दरपत्रक''** असे नमुद करावे. तसेच दरपत्रके हे कार्यालयीन वेळी (सकाळी १०.३० ते सायं.५.००)पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून बंद लखोटयात आणुन दयावेत.

२. रद्दीचा दर खालील प्रमाणे नमुद करावा. इतर प्रकारे दर नमुद केल्यास दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | रद्दीचा तपशिल | प्रती किलो दर रू. |
|---|---|---|
| १. | जुनी रद्दी(नाश करण्यात आलेल्या अभिलेखाची) | |

३. रद्दी खरेदीदाराने स्वतःचा इलेक्ट्रॉनिक वजन काटा सोबत आणावा. वजनकाटयात कांही फेरफार आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. जो खरेदीदार जास्तीत जास्त किंमत देईल त्यालाच रद्दी विक्री करण्यात येईल.

५. संपुर्ण रद्दी मोजणी झाल्यावर त्याच दिवशी वित्त व लेखा विभाग, जिल्हा न्यायालय, लातूर यांचेकडे रक्कम जमा करावी.

६. रद्दी घेवून जाण्यासाठी लागणारा बारदाना तसेच वाहतुक खर्च स्वतः खरेदीदारानेच करावयाचा आहे.

७. रद्दी विक्री मंजुर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, लातूर यांनी स्वतःकडे राखुन ठेवला आहे.

आदेशावरून,

DISTRICT AND SESSIONS COURT LATUR

1-9-2026

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, लातूर

दिनांक : ०१.०९.२०२६

प्रत :–

१. जिल्हा न्यायालय, लातूर यांचे संकेतस्थळ

२. जिल्हा न्यायालय, लातूर नोटीस बोर्ड.